Impact Factor - 6.293 ISSN-2349-638x

# Aayushi International Interdisciplinary Research Journal (AIIRJ)

PEER REVIEWED & INDEXED JOURNAL

Special Issue No.71

## Significance Of Fairs And Festivals In Human Life

**Chief Editor**

**Pramod P. Tandale**

IMPACT FACTOR

SJIF 6.293

For details Visit our website

www.aiirjournal.com

# भारतीय सण-उत्सवातील रोजगारसंधी

**श्रीमती स्मिता रावसाहेब पुजारी**
सहाय्यक प्राध्यापक
कॉमर्स विभाग,
राजर्षी छत्रपती शाहू कॉलेज,कोल्हापूर

**प्रस्तावना-**

भारत हा बहुविध जातीधर्मियांनी नटलेला देश आहे. सर्व जगातील धर्म भारतात कोणत्या ना कोणत्या भागात आढळतात. हिंदू, बौध्द, जैन, शीख, इस्लाम, ख्रिस्ती आदी धर्मांचा विकास भारतातच घडून आला. तसेच सामाजिक चालीरीती, सण - समारंभामध्ये राज्यानुसार विविधता आढळते.

**भारताची लोकसंख्येची विभागणी खालीलप्रमाणे दिसते.**

| धर्म | हिंदू | इस्लाम/मुस्लिम | ख्रिश्चन | बौध्द | जैन | शीख | इतर |
|---|---|---|---|---|---|---|---|
| लोकसंख्या % | ८२.६ | ११.३५ | २.४३ | ०.७१ | ०.४८ | १.९६ | ०.०३ |
| धर्मग्रंथ | भगवद्गीता | कुराण | बायबल | त्रिपिटक | आगम | गुरुग्रंथ साहिब | |
| प्रभाव | हिंदू-देवता | पैगंबर | येशू ख्रिस्त | गौतम बुध्द | भगवान महावीर | गुरुनानक | |

अशा विविधतेने नटलेल्या भारतीय सणसमारंभातील रोजगारनिर्मिती हा अभ्यासाचा विषय आहे.

**उद्देश-**

१. भारतीय सण-उत्सवांची माहिती घेणे.
२. निवडक सणसमारंभातील रोजगार संधीचे निरीक्षण नोंदविणे.
३. शैक्षणिक संकुलातील सणसमारंभातील रोजगाराच्या संधी अभ्यासणे.
४. सण समारंभातील समस्या व उपाययोजनांचा परामर्श घेणे.

**गोषवारा –**

भारत हे बहुधर्मीय सण समारंभाचे प्रेक्षणीय संग्रहालय आहे. भारतीय संस्कृतीत सण समारंभांना सामाजिक, अध्यात्मिक भावनिक अधिष्ठान आहे. तसेच आर्थिक महत्वही आहे. गुढीपाडव्यापासून अक्षय तृतीयेपर्यंत विविध सणात मोठया प्रमाणात वस्तू व सेवांच्या खरेदी विक्रीतून आर्थिक उलाढाल होते व त्यातून रोजगारनिर्मिती होते. विविध जयंत्या, जत्रा, वैयक्तिक समारंभ व राष्ट्रीय सणामुळे मोठी उलाढाल होऊन देशाच्या संपत्तीत भर पडते .शैक्षणिक संकुलामध्ये मोठया प्रमाणावर स्नेहसंमेलन, पदवीदान समारंभ रोजगार निर्मिती करतात. त्यामुळे युवापिढीच्या कौशल्य विकासाला आर्थिक पाठबळ लाभते.

➢ **दिवाळी :-**

दिवाळी म्हणजे सणांचा राजा. संपूर्ण भारताचा हा एक महत्वाचा सण आहे. गरीब असो वा श्रीमंत, शिक्षित असो वा अशिक्षित, ग्रामीण असो वा नागरी सर्वच या सणाच्या आनंदात सहभागी होतात. शाळेला, सरकारी कचेऱ्यांना, चाकरमान्यांना सुटया मिळतात. सासुरवाशिणी माहेरी येतात. नवे कपडे, नव्या वस्तू, नवीन गोडधोड, मेवामिठाई, फटाके, फुलबाजे, खेळाची धामधूम, हास्यविनोद, मित्रांच्या गाठीभेटीमुळे सारे वातावरण भरुन गेलेले असते.

अश्विन महिन्यातील शेवटचे तीन व कार्तिक महिन्यातील आरंभीचे दोन दिवस असे या सणातील पाच दिवस अनेक कार्यक्रमानी फुलून गेलेले असतात.

दिवाळीच्या सणातील पहिला दिवस म्हणजे धनत्रयोदशी याला धनतेरस असेही म्हणतात. या दिवशी उत्तर प्रदेशातील लोक तांब्यापितळेची भांडी विकत घेतात. लहान मुले विटा, माती, धान्याच्या गोणीवर माती लेपून किल्ले तयार करतात. या दिवशी संध्याकाळी लोक धनाची व आयुर्वेदिक औषधाची पूजा करतात धन्वंतरी देवीचे फोटो पूजन करतात.

दिवाळीचा दुसरा दिवस म्हणजे नरकचतुर्दशी या दिवशी सर्वजण पहाटे उठतात व अंगाला उटणे, सुवासिक तेल लावून आंघोळ करतात जो उशिरा उठेल तो नरकात जातो अशी कल्पना आहे.

दिवाळी सणाचा तिसरा दिवस लक्ष्मीपूजनाचा असतो. यादिवशी अमावस्या असते. लक्ष्मीपूजनाच्या दिवशी व्यापारी, अडत बाजारवाले, दुकानदार हे लक्ष्मीच्या प्रतिमेची पूजा करतात. दुकानात लक्ष्मीचा फोटो असणारी जमाखर्चाची वही व वजनमापांची पूजा केली जाते. नैवेद्य म्हणून साळीच्या लाहया व बत्तासे दिले जातात. व्यावसायिक इष्ट मित्रांना व्यवसायबंधूना चहा व पानसुपारीसाठी तर घरोघरी सुवासिनींना हळदी-कुंकवासाठी बोलावून त्यांना लाहया, बत्तासे, ३ प्रसाद म्हणून देण्यात येतो.

चौथा दिवस बलिप्रतिपदा या नावाने ओळखला जातो. कार्तिक शुध्द प्रतिप्रदेचा हा दिवस होय यालाच दिवाळी पाडवा असेही म्हणतात. हा दिवस एकूण वर्षातील साडेतीन मुहूर्तापैकी एक शुभमुहूर्त मानला जातो. या दिवशी लोक हौसेने नवीन सोन्याचे दागिने, इलेक्ट्रॉनिक वस्तूंची खरेदी करतात.

दिवाळीच्या सणातील पाचवा आणि शेवटचा दिवस म्हणजे भाऊबीज होय, बहीण-भावाच्या प्रेमाचा मंगल दिवस यालाच यमद्वितीया असेही म्हणतात. यादिवशी बहिण भावाला मंगलस्नान घालते. पाट-रांगोळयांचा थाट करते. गोडधोड खाऊ करते सर्व भावंडे मिळून मिसळून अंगतपंगत करुन जेवतात.

**रोजगारसंधी**

- मातीचे दिवे, विद्युत दिवे, लाइटिंगच्या माळा बनविणारे कारागीर व व्यापा-यांना उपलब्ध होणारी बाजारपेठ
- चिवडा, चकली, अनारसे, करंजी, लाडू, शंकरपाळी अशा दिवाळीच्या खमंग फराळरुपी खादयपदार्थाचे स्टॉल्स्, त्यातून सुगरणी, गृहिणी, आचारी व विक्रेत्यांना प्राप्त होणारा रोजगार
- बांबू, पत्रे वा प्लास्टिकचे छप्पर मारण्यासाठी होणारी साहित्याची मागणी, त्यांचा होणारा व्यापार
- बहुरंगी, बहुढंगी कागदापासून, क्वायलपासून, प्लास्टिकपासून बनणा-या आकाश कंदिलाचे स्टॉल्स व त्यातून मतिमंदाच्या शाळेतील मुलांना दिला जाणारा व्यावसायिक कौशल्याचा व रोजगाराचा आर्थिक हातभार
- मोती साबण, उटणे, उत्तर, सुगंधी तेलाचे उत्पादन व विक्रीतून निर्माण होणारी व्यवसाय संधी
- पांढ-या व रंगीत रांगोळया तयार करण्याचा व्यवसाय, सुट्टी व छोटी पाकीटे भरुन किरकोळ स्वरुपात विकणा-या फेरीवाल्यांचा व्यवसाय
- फटाकडयांच्या उदयोग व स्टॉलधारकांना व्यापारसंधी
- लक्ष्मीपूजनासाठी लागणा-या साहित्याची बाजारपेठ उदा. लक्ष्मीची प्रतिमा, हिशोब पुस्तके, हळदी-कुंकू, फुले, पूजेचे साहित्य
- झेंडूंची फुले, हार व गज-यांचा व्यापार
- पारंपारिक व फॅशनेबल रेडिमेड कपडयांचा व शिलाईचा व्यापार
- मुलींना कपडयांबरोबरच मॅचिंगचे नेलपेंट, बांगडया, केसातील पिना, कर्णफुले, गळयातील हार, नवीन चपलांचा व्यवसाय
- फेशीयल, ब्लीच, आयब्रो केशरचना, मेहंदीसाठीही ब्युटीपार्लरचा व्यवसायव सहाय्यकाद्वारे घरगुती सेवा
- दिवाळी पाडव्याला सोन्याची खरेदी, गाडी खरेदी, फर्निचर इलेक्ट्रॉनिक वस्तूंची कोटयावधीच्या उलाढालीची बाजारपेठ व व्यवसाय संधी

➤ **गौरीगणपती –**

भाद्रपद शुध्द चतुर्थीच्या दिवशी गणपतीचे आगमन होते. यादिवशी घरी व चौका-चौकात तरुण मंडळे गणपती बसवितात. कुंभाराकडून किंवा स्टॉलमधून बाप्पांची मूर्ती आणून त्याची प्रतिष्ठापना केली जाते. सकाळ,संध्याकाळ आरतीची वेळ फक्त घरामध्ये नाही तर संपूर्ण वातावरणामध्ये भक्ती निर्माण करतो. परंपरेप्रमाणे दीड दिवस, पाच दिवस, सात दिवस तर कुठे दहा दिवस गणेशाची पूजा केली जाते. पेशव्यांच्या काळात हा उत्सव गणेश चतुर्थीपासून दशमीपर्यंत साजरा केला जात असे.

गणपती बरोबरच गौरीचा सण जोडून येतो. भाद्रपदात ज्या दिवशी जेष्ठा नक्षत्र उगवते त्यादिवशी घरोघर गौरीची पूजा करतात अनेकांच्या घरी मुखवटयाची गवर असते. मानेपासून वरच्या भागाची मूर्ती असते. एखादया लोखंडी पट्टयाच्या आडणीवर किंवा तेरडयाच्या झाडांच्या जुडीवर हे मुखवटे घट्ट बसवितात. त्याला साडी, खण नेसवितात. बाजूस कापडी हात बसवितात कमरपट्टा, नाकात नथ, बिंदी, भैरव जुबे तोड व कानातील अलंकारानी सुशोभित झालेल्या लक्ष्मीचे सुंदर ध्यान मोहक दिसते. विविध प्रकारची खेळणी,घोडा, वेगवेगळया आकारातील मेवामिठाई, सुगंधी द्रव्य, सुवासिक पुष्पे यांच्या मदतीने गौरीपुढे आरास करतात. पहिल्या दिवशी गौरी येतात, दुस-या दिवशी त्या घरातील बालगोपाळाबरोबर जेवतात व तिस-या दिवशी जातातअसे मानले जाते. यादिवशी घरोघर गोडधोड करतात. सुवासिनींना बोलावून हळदीकुंकवाचा कार्यक्रम साजरा करतात. आग्रहाने जेवू घालतात. नवविहितेची खणानारळाने ओटी भरतात.

ज्यांच्या घरी गौरीची आरास मांडली जाते,तिथे आसपासच्या ओळखीच्या सख्या एकत्र जमून झिम्माफुगडी खेळतात. नाचून, गाऊन गौरी जागवतात. सरतेशेवटी गणपती सोबतच गौरीचे विसर्जन केले जाते.

**रोजगारसंधी-**

- नानाविधरुपी गणपती बाप्पांच्या व गणोबाच्या मूर्ती घडविणा-या कुंभारांना सहकुटूंब रोजगारनिर्मिती व त्यांना रंग देणा-या पेंटर्सना रोजगार संधी व स्टॉल्सधारकांनाव्यवसाय संधी
- मंडपासाठी, स्टॉल उभारण्यासाठी लागणा-या बांबू, पत्रेइ. व्यवसायाची संधी

- पूजेचे साहित्य, ताट, कापूस, कापसाच्या तयार वाती, कापसांचे हार बनवणा-या व्यवसायास संधी
- प्रत्येक गणेशमूर्तीस फुलांचा हार वा कृत्रीम हार बनविणा-यासाठी रोजगारसंधी
- गौरीचे मुखवटे बनविणा-या कारागिरांना संधी
- लोहाराकडे लोखंडी पट्टयांच्या आडणीच्याव्यवसायसंधी
- गौरीच्या मुखवटयाऐवजी गुलाबी फुलरुपी गौरी, शुभ्रपुष्प वर्णी शंकरोबांचे, चाफ्याच्या पानांसह जुडे करुन, दुर्वा, आगाडा विक्री वाढवणारा व्यवसाय
- डेकोरेशनसाठी लाकडी, थर्माकाल किंवा घरगुती कल्पनांनी निर्मित मंदीर कलाकृती विक्रीचा व्यवसाय
- ठिकठिकाणी मंडळाकडून देखाव्यासाठी लागणा-या साहित्याची खरेदी करण्यासाठी किंवा भाडयाने घेण्यासाठी उपलब्ध बाजारपेठेची संधी उदा. मुकूट पेहेराव,ड्रेपरी फेटे इ.
- मंडळाच्या महाप्रसादासाठी वर्गणी मागणा-या मंडळाची पावती पुस्तके छापणा-या प्रिंटींगप्रेसचा व्यवसाय
- होम, पूजन,मंत्रपूजन यासाठी ब्राम्हण भटजींना मिळणारा रोजगार, पानसुपारी, उदबत्ती, कापूर, नारळ विक्रीची बाजारपेठ वृध्दी
- पारंपारिक झांजपथक व लेझीमपथकातील मुला-मुलींना मुंबईला झांजपथक प्रदर्शनाद्वारे मिळणारा रोजगार

➢ **मकरसंक्रांत-**

संक्रांत म्हणजे संक्रमण. सूर्याच्या एका राशीतून दुस-या राशीत जाण्याच्या क्रियेस संक्रमण म्हणतात. सूर्य मकर राशीत आला की मकर सक्रांत होते या दिवसानंतर सूर्य विषुवृत्ताच्या उत्तरेकडे सरकू लागतो व दिवस पंचांगाप्रमाणे १४ जानेवारीस सक्रांत असते.

संक्रांत हा स्त्रियांचा-विशेषतः नवीन लग्न झालेल्या मुलींचा सजण्याचा सण. यादिवशी गूळ-खोब-याचा नैवेदय दाखवतात. संध्याकाळी सुवासिनींना हळदी-कुंकवासाठी बोलावितात. मातीच्या मडक्यात भुईमुग, गाजर, ऊसाचे तुकडे,शेंगा, पैसा,सुपारी इ.सुपात ठेवून त्याची पूजा करतात. सुवासिनी सुगडे देतात. भेटकार्डे व शुभेच्छा पाठवतात. कोल्हापूरमध्ये स्थित पंढरपूर,सोलापूरवासीय लाखेचे चुडे खरेदी करतात व ऊस, साखर, बोर,गाजराच्या ताटामधून चुडयाचे वाण दान करतात. नव्याने लग्न झालेल्या मुलीला हलव्याचे दागिने घालून सजवतात. जावयास भेटवस्तू देतात. १ ते ५ वर्ष वयातील मुलांना बोरनहान घालतात बोरे चॉकलेट, चिरमु-यांनी स्नान घालून ते वाटतात व दीर्घायूची कामना करतात.

**रोजगारसंधी –**

- संक्रांतीमध्ये तिळगूळ, तिळगूळाच्या वडया, वेगळे तीळ, गूळ,त्यांची चौकोनी बरफी,गोल रेवडी याद्वारे तिळाची बाजारपेठ व व्यापारवाढीस संधी
- लहान मुले व महिलांसाठीतिळाचे दागिने करणा-या कारागिरांस रोजगारसंधी
- लाखेचे चुडे बनवणा-या बाजारपेठेस वाव व व्यापारसंधी
- बोरनहान वा संक्रातीमध्ये गाजर,बोरे,शेंगा,मिक्स भाज्यांच्या उत्पादनास व विक्रीवृध्दीची संधी
- मातीचे मडकी बनवणा-या कारागिरांना व विक्रेत्यांना संधी
- संक्रांतीस नोकरदार महिलाकडून काळया रंगाच्या साडीस मागणी व बाजारपेठ संधी
- नवीन साडीबरोबर ड्रेस व ब्लाऊज शिवणा-या, पिको-फॉल करणा-या लहान व्यावसायिकांना संधी

➢ **गुढीपाडवा-**

शिशिरऋतूबरोबर कडाक्याची थंडी संपते. वसंत सरसावतो चैत्र शुध्द प्रतिपदा म्हणजे मराठी वर्षाची सुरवात, गुढीपाडव्याचा मंगल सण भारतात भव्य राजवाडा असो वा सामान्य झोपडी या दिवशी घरासमोर गुढी उभारलेलीच असते. एक सरळ उंच साधी किंवा वेताची काठी घेतात. त्याच्या वरच्या टोकाला चांदीचे, तांब्याचे किंवा पितळेचे आधुनिक भारतात स्टीलचे भांडे पालथे घालून बांधतात. एक नवीन सुंदरसे रेशमी वस्त्र/ किंवा चोळखण, कडुनिंबाचे डहाळे,साखरेच्या गाठीची किंवा खोब-याच्या वाटीची माळ त्याला घालतात हीच गुढी होय. गुढीला गंध-फुले वाहून पूजा करतात, स्वतंत्र गूळ खोब-याचा नैवेद्य दाखवतात, घरोघरी पुरणपोळया व अन्य गोड-धोड करतात. कडूलिंबाची पाने,मिरे,हिंग,साखर,जिरे,ओवा,चिंच बारीक ठेचून खातात त्यामुळे उत्तम आरोग्य लाभते व बुध्दी तेजस्वी होते.

- गुढीच्या काठयांच्या विक्रीची व्यवसायसंधी
- बांबूचा पुरवठा करण्यासाठी वाहनांना व मालकांना रोजगार
- साखरेच्या माळांचे उत्पादन व विक्रीसंधी
- फुलांच्या माळा,चाफ्यांची माळांची बाजारपेठ

➢ **विविध जयंत्या**

शिवजयंतीस मोठया उत्साहाने छोटयापासून मोठयापर्यंत ज्योत आणण्यासाठी पहाटेची लगबग सुरु होते. भगवे झेंडे,भगवा टी शर्ट, कपाळास भगवी फीत अष्टगंध व महाराजांच्या फोटोच्या फ्लेक्स इ.साठी बाजारपेठ फुलून जाते. आधीपासून छोटी मंडळे पावती पुस्तके छापून वर्गणी जमवितात व ऐपतीप्रमाणे शिवरायांची मूर्ती आणून पूजा करतात. पताका लावतात यात छोटयांचा उत्साह वाखाणण्याजोगा असतो. शिवरायांवरील पोवाडे निबंध स्पर्धा,वक्तृत्व स्पर्धा इतिहास जागा करतात.

आंबेडकर जयंतीस निळे झेंडे, निळी फीत, निळ, निळया-पांढ-या साडया, ड्रेसची मागणी वाढते वर्गणीतून जमा रक्कम मिरवणूकीमध्ये ऑर्केस्ट्रा, प्रतिमा मिरवणूकीसाठी ट्रक व्यवस्था करण्यासाठी वापरली जाते. गौतम बुध्द जयंतीस पांढरी साडी, ड्रेस, मेणबत्ती, फुले यांची मागणी वाढते.

भारतामध्ये जसे सण, जयंत्या उत्साहाने साजरे करतात तसेच २६ जानेवारी हा प्रजासत्ताक दिन व १५ ऑगस्ट हा स्वातंत्र्यदिनही तरुणांचे देशप्रेम जागवतो. भारतीयांचा तिरंगी झेंडा, कागदी व प्लॅस्टिकचे झेंडे, कलचची बाजारपेठ रोजगार निर्मिती करते. देशभक्तीवर गीतांच्या कॅसेटस,सीडीज, जिलेबीचे स्टॉल्स,शाळा,महाविद्यालयीन शिक्षकाकडून पांढ-या साडया व ड्रेसची मागणी वाढवते.

➢ **जत्रा –**

विविध ग्रामीण यात्रा, टेंबलाईची जत्रा, वडयावरची आंबील खालील छोटया व्यवसायांच्या विक्रीकक्षा रुंदावतात.

- भेळ, पाणीपुरी, रगडा पॅटीस, नैवेद्य, खणचोळी साडी विक्री केंद्रे देवतांच्या प्रतिमा, मूर्ती, पुस्तके, किचेन्सची निर्मिती व व्यापारकेंद्रे
- आईस्क्रिम, फालूदा,ज्यूसचे स्टॉल
- लहान मुली, महिलासाठी सौंदर्यप्रसाधनांचे स्टॉल
- स्वस्त व मस्त सर्वांना परवडणा-या दरातील कपडयांची विक्री करणारे स्टॉल
- चप्पलचे स्टॉल्स-व्हिडिओ गेम्स, फनी गेम्सचे स्टॉल
- लहान मुला-मुलींसाठी बाहुली, टेडी, मोबाईलसारख्या खेळण्यांचे स्टॉल
- लाकडी व मातीची बैले, पोळपाट-लाटणे, जाते, अशी सुबक, आकर्षक वस्तूनिर्मिती करणारी ग्रामीण रोजगार
- मोबाईल स्क्रीनगार्ड, कव्हर, सेल्फीस्टिकची विक्री केंद्रे

➢ **महोत्सव**

भारतामध्ये व त्यातही कोल्हापूरमध्ये सणउत्सव साजरे करण्याची प्राचीन परंपरा आहे. त्यामध्ये भर म्हणून दसरा महोत्सव, रंकाळा महोत्सव, कोल्हापूर भीमा कृषी प्रदर्शन, पुष्पमहोत्सव यासारख्या कार्यक्रमाद्वारे लोकांना एकत्र बोलावून आनंदोत्सव साजरा केला जातो. महिला बचत गट खादयपदार्थ विक्रीसाठी व हस्तकौशल्याद्वारे निर्मित वस्तूंसाठी विक्री केंद्रे उभारली जातात. लाकडी वस्तू, फर्निचर, खादीच्या वस्तू व कालातीत वस्तूंचे दालनप्रदर्शनाद्वारे या विक्री केंद्रास नवीन झळाळी प्राप्त करुन देते यात सोलरचे, प्रायव्हेट शाळा व प्रोफेशनल कॉलेजचे माहितीपत्रक वाटले जाते., सेंद्रिय गूह विक्री खतविक्री स्टॉल लावण्यात येत व विविध व्यवसायिकांना बाजारपेठ व बेरोजगारांना रोजगारप्राप्ती होते. कला महोत्सव विविधांगी गायन कला, हास्यकला, अभिनयकला यांची झालर लाभलेला कलाकार अशा महोत्सवातूनच पुढे नावारुपास येतो. त्यामुळे हे महोत्सव म्हणजे हौशी कलाकारांचा हक्काचा प्लॅटफॉर्म आहे रांगोळी, तलावारबाजी, दांडपट्टा यासारख्या कलाकृती डोळयांचे पारणे फेडतात.

➢ **वैयक्तिक समारंभ –**

- लग्न, बारसे डोहाळजेवण, वास्तूशांती, बर्थडे सेलिब्रेशनसाठी सर्व पाहुण्यांना बोलावून घरामध्ये समारंभ करण्याऐवजी 'Event management'कडे लोकांचा कल वाढत आह. त्यामुळे कौशल्यअसणा-या लोकांना संगीत, मेहंदीचे, साहित्य असणा-याकडे मंडप व्यवस्थेचे, रुचकर जेवण बनवणा-याकडे कॅटरिंगचे, फुलविक्रेत्यांकडे फ्लॉवर डेकोरेशनचे काम सोपवून प्रमोशनला वेगळी मुले लावून इव्हेंट मॅनेजर नावाची नवीन रोजगार केंद्रे निर्माण होत आहेत.

❖ **शैक्षणिक संकुलातील सण समारंभातील रोजगारसंधी**

आधुनिक काळात मोठमोठया शाळामध्ये महाविलयामध्ये व विदयापीठ स्तरावरील ण समारंभाच्या कार्यक्रमामध्ये विविध रोजगार निर्माण होतात जसे शाळेतील स्नेहसंमेलन असो वा युवा महोत्सव खालील बाबींवर खर्च करुन रोजगार निर्माण केला जातो. औपचारिक आमंत्रणपत्रिका छपाई, जाहिरात

- स्नेहसंमेलनासाठी ग्राऊंड उपलब्ध असल्यास स्टेज व्यवस्था, मंडप नसल्यास भाडयाचा हॉल व समारंभ व्यवस्थापनाची नेमणूक
- नृत्यदिग्दर्शक, व्यावसायिक गायक, मेकअपमन यांची निवड

- संगीतवाद्य , ढोलताशा, डॉल्बी, स्टेरिआ, स्पीकर खरेदी वा भाडेतत्वावर उपलब्धी
- फोटोग्राफी व ऑडिओ, व्हिडिओ रेकॉर्डिंग, सीडीज निर्मिती व विक्रीसाठी व्यवसाय संधी
- पथनाटय,नृत्याविष्कारासाठी आवश्यक वेशभूषा खरेदीची बाजारपेठ यावरुनही फक्त विविध पोषाख मुखवटे, ड्रेपरीसाठी लाखोंची गुंतवणूक करुन व्यवसाय सुरु होतो व एका दिवसाला एका ड्रेससाठी १०० रुपये भाडे आकारणारे व्यवसाय वृद्धिगंत होत आहेत.

पदवीदान समारंभ, नॅशनल, इंटरनॅशनल सेमिनार यातूनही मंडप व्यवस्था, कटरिंग, सर्टिफिकेट प्रिंटींग सारख्या उदयोगांना रोजगार मिळतो.

❖ **समस्या–**

१. २१ व्या शतकामध्ये लोक दिवाळीसारखे सण साजरे करताना स्थानिक बाजारपेठेपेक्षा ऑनलाईन बाजारपेठेतील ऑफर्सना भूलतात व ऑनलाईन फॅशनेबल कपडे खरेदी करतात त्यामुळे स्थानिक बाजारपेठेस फटका बसतो. ऑनलाईनमुळे वेळेवर व आवडीचे मापाचे कपडे न मिळाल्यास सणाचा आनंद घेता येत नाही.

२. गणेशोत्सवाच्या काळात मूर्ती, हारतुरे इ. विसर्जन नदी, विहीरीत केल्यामुळे पाणी दूषित बनते.

३. दसरा, पाडवा, वटपौर्णिमा,मार्गशीर्षातील गुरुवार या दिवशी आपटयाची पाने, कडूनिंब,वडाच्या फांदया, फळा-फुलांचे डहाळे तोडून व्यापारी विक्रीस ठेवतात. त्यामुळे निसर्ग व पर्यावरणाची हानी होते.

४. थोर महापुरुषांची जयंती साजरी करताना त्यांचे शिक्षण व शिकवणीचा विसर पडलेला दिसतो. त्यामुळे सायलेंसर काढून फिरणे, कर्णकर्कश डॉल्बीच्या आवाजावर थिरकणे हे संस्कृतीऐवजी अधोगतीचे दयोतक आहे.

५. भाडे तत्वावर मिळणा-या वस्तू या विशिष्ट व्यावसायिकाना रोजगार देत असल्या तरी कायमची बाजारपेठेतील रोजगारसंधी हिरावून घेत आहेत.

❖ **उपाययोजना-**

१. ग्राहकांनी ऑनलाईनपेक्षा स्थानिक बाजारपेठेतून खरेदी केल्यास हवी तशी ऐनवेळी खरेदी करुन सणांचा आनंद द्विगुणित करता येतो.

२. अनंतचतुर्थीला गणेश मूर्तीचे दान करुन जलप्रदूषण टाळता येते.

३. नागरिक जागरुक झाल्यास वडाच्या फांदया, झाडांचे डहाळे तोडले जाणार नाही. व निसर्गाचे विद्रुपीकरण रोखले जाईल.

४. महापुरुषांची जयंती वक्तृत्व स्पर्धा, निबंध स्पर्धा, पथनाटय अशा विधायक उपक्रमाद्वारे साजरी करण्यासाठी शाळा व महाविद्यालयानी पुढाकार घेणे आवश्यक आहे.

५. वंशपरंपरागत कारागिर आपल्या वस्तूंची कायमची बाजारपेठ टिकवून ठेवण्यासाठी ऑनलाईन विक्रीचा मार्ग स्विकारु शकतात.

**संदर्भसूची**

१. सण वार व्रतवैकल्ये

२. लोकसंस्कृती : स्वरुप आणि विशेष – द.ता.भोसले

३. भारतीय सण आणि समारंभ

ISSN 2349-638X
www.aiirjournal.com